# भुसावळ नगरपरिषद, भुसावळ

## ता.भुसावळ जिल्हा - जळगाव

Phone No.-02582-225403 Toll Free No.-1800 233 5264,
Website - www.bhusawalnp.org
Email - BMCBSL1882@GMAIL.COM

जा.क्र./भुनप/आरोग्य/ २७२/२०२२-२३
दिनांक : १५/११/२०२२

**कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City Co-ordinator) पद भरतीची जाहीर सूचना**

नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.स्वमअ-२०२२/प्र.क्र.११०/नवि-३४ दि.०७/११/२०२२ व मा.राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई यांचेकडील पत्र क्र. जा.क्र./राअस २.०/१०१६/२२-२३ दि.०९/११/२०२२ नुसार तसेच मा.सहायक आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांचे पत्र क्र. पालिका-३/कावि/१०१४/२०२२ दि.१४/११/२०२२ नुसार भुसावळ नगरपरिषदेस स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयकाची (City Co-ordinator) नियुक्ती करावयाची आहे. ''शहर समन्वयक'' (City Coordinator) ची निव्वळ कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यासाठी नियुक्ती करण्यासाठी खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. खालील पात्रताधारक उमेदवारांनी त्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रासोबत दि.१६/११/२०२२ ते दि.२२/११/२०२२ पावेतो कार्यालयीन वेळेत या कार्यालयात हार्ड कॉपीमध्ये सादर करावे. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. ई-मेलद्वारे सादर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विहित नमुना अर्ज तसेच याबाबतच्या अटी व शर्ती नगरपरिषद कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-ordinator) | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी :<br>i) बी.ई./बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>ii) बी.आर्क<br>iii) बी.प्लॅनिंग<br>iv) बी.एस.सी. (कोणतीही शाखा)<br>अनुभव :<br>स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. (स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील) | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव मर्यादा शिथील करता येईल) | रु. ४५,०००/- (रु.पंचेचाळीस हजार मात्र) |

पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता पाचारण करण्यात येईल. सदर प्रक्रियेत बदल अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहे. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

शिक्का

सही/-
**(संदिप चिद्वार)**
मुख्याधिकारी
भुसावळ नगरपरिषद, भुसावळ